महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय , लेखा व कोषागारे
"कस्तुरी" इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०.
दुरध्वनी क्रमांक: ०२२-२२६२२०३६ ई-मेल : aaomahapardat.mu-mh@gov.in

**पहा :** १. सा.प्र.वि.अधिसूचना क्र. एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५ (भाग-१/२०१९/दहा, दि.०९.०७.२०१९.
२.सा.प्र.वि., शासन निर्णय क्र. एआयएस-१०२५/प्र.क्र. ४८/२०२५/भाप्रसे-१, दि.२४.०७.२०२५.
३.सा.प्र.वि. पत्र क्र. एआयएस-१०२५/प्र.क्र.४८/२०२५/भाप्रसे-१, दि.२५.०७.२०२५

*****************************************************************************************************

क्रमांक:संलेको-०७.२०२५/गोअक/भारतीय प्रशासन सेवा/ 376 दिनांक- 28/07/2025

## परिपत्रक

**विषय-** सन २०२५ मध्ये (निवडसूची २०२४) बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्ती करण्यासाठी अधिकाऱ्यांची शिफारस करण्याबाबत...

बिगर राज्य नागरी सेवेतून (NON-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष व कार्यपध्दती संदर्भ क्र. २ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२४.०७.२०२५ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकारी यांचा भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२४.०७.२०२५ मधील शासन निर्णयातील पात्रता निकष पूर्ण करित असलेल्या अधिकाऱ्यांचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावाचा समावेश करण्यासाठी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांचे गोपनीय अहवाल अभिलेख खालील नमूद निर्देशानुसार परिपूर्ण स्थितीत संचालनालयास सादर करावे.

(१) दिनांक १ जानेवारी, २०२४ या दिनांकास ज्या अधिकाऱ्याचे वय ५६ वर्षापेक्षा जास्त नाही अशा अधिकाऱ्यांनीच प्रस्ताव पाठवावा. (म्हणजेच दिनांक ३१.१२.१९६७ रोजी किंवा त्याआधी जन्म दिनांक असणारे उमेदवार अपात्र राहतील). यापूर्वी निवड झालेल्या काही अधिकाऱ्यांकडून केंद्र शासनाकडील अधिसूचनेत त्यांच्या जन्मदिनांकाची / नावाची नोंद बरोबर नसल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे. अशा स्वरुपाची प्रकरणे भविष्यात उद्भवू नयेत

याकरीता प्रस्ताव पाठविताना अधिकाऱ्यांचा जन्मदिनांक/नाव ही माहिती, सेवापुस्तक/उपलब्ध अभिलेखाप्रमाणे अचूक नमूद असणे आवश्यक आहे.

(२) भा.प्र.से. (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील नियम ४ मधील तरतूदीनुसार म.वि.ले.से. गट-अ संवर्गातील सहाय्यक संचालक/ उपसंचालक/ सहसंचालक/ संचालक पदावर प्रत्यक्षपणे दिनांक ०१.०१.२०२४ रोजी ८ वर्षे सेवा पूर्ण करीत असलेल्या अधिकाऱ्यांचाच समावेश करण्यात येईल. सेवा कालावधीची गणना करताना दिनांक ०१.०१.२०२४ पर्यंतचा कालावधी विचारात घेण्यात यावा. सेवा कालावधीची गणना करताना मानीव दिनांक विचारात घेण्यात येऊ नयेत.

(३) विभागीय तसेच न्यायालयीन चौकशी / फौजदारी कार्यवाही सुरु असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांचा प्रस्ताव संचालनालयास पाठविण्यात येऊ नये.

(४) सन २०२४ च्या निवडसूचीकरिता दि.३१.०३.२०२४ पर्यंतचे मागील सलग ८ वर्षांचे (सन २०१६-२०१७ ते सन २०२३-२०२४) सर्व संस्करण पूर्ण होऊन अंतिम झालेलेच गोपनीय अभिलेख विचारात घेणे आवश्यक आहे.

(५) मागील ८ वर्षांपैकी किमान ७ वर्षांचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ट (अ+) असणे आवश्यक राहील. ८ पैकी उर्वरीत १ अहवाल उत्कृष्ट/चांगला (प्रतवारी "अ" / गुण ६ किंवा त्यापेक्षा जास्त परंतु ८ पेक्षा कमी / प्रतवारी "ब" / गुण-४ किंवा त्यापेक्षा जास्त परंतु ६ पेक्षा कमी) असल्यास हरकत नाही.

(६) गोपनीय अहवालांची प्रतवारी उंचावण्यात आलेली असेल तर अशा गोपनीय अहवालांची प्रतवारी उंचावण्याबाबत करण्यात आलेली कार्यवाही ही सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा दि.०१.११.२०११ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांस अनुसरून असेल तरच अशा उंचावण्यात आलेल्या गोपनीय अहवालांची प्रतवारी विचारात घेण्यात येईल.

(७) वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२ नुसार मागील ८ वर्षाच्या कालावधीत वैध कारणास्तव देय व अनुज्ञेय विशेष असाधारण रजेवर असलेल्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेताना त्यांच्या विशेष असाधारण रजेचा कालावधी वगळून मागील तेवढ्या कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन असे एकूण ०८ वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे उपलब्ध गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टीगकरीता विचारात घेण्यात येतील.

(८) वैध कारणास्तव देय व अनुज्ञेय मंजूर करण्यात आलेल्या रजेमुळे संपूर्ण वर्षाची NRC असेल तर सदर कालावधी वगळून मागील तेवढ्या कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन असे एकूण ८ वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येतील.

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकाऱ्यांची भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीची शिफारस करण्यासाठी उपरोक्त प्रमाणे जे अधिकारी पात्र असतील त्या सर्व अधिकाऱ्यांनी त्यांचे सन २०२४ च्या निवडसूचीकरिता दि.३१.०३.२०२४ पर्यंतचे मागील सलग ८ वर्षाचे (सन २०१६-१७ ते सन २०२३-२०२४) सर्व संस्करण पूर्ण होऊन अंतिम झालेलेच गोपनीय अभिलेख** विचारात घेऊन सर्व गोपनीय अहवालांचे **इंग्रजी भाषेत अनुवाद** करून ते संचालनालयास Soft copy (pdf स्वरूपात) **aaomahapardat.mu-mh@gov.in** या ईमेल आयडीवर **दि. ३१.०७.२०२५** पर्यंत पाठविण्यात यावेत व मूळ प्रत (Hard copy) **दि. ०४.०८.२०२५** पर्यंत संचालनालयास सादर करावी.

तसेच भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीकरीता महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील जे अधिकारी इच्छुक आहेत त्यांनी सोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यातील Declaration दि. ३१.०७.२०२५ पर्यंत संचालनालयास सादर करण्यात यावे. जे अधिकारी भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीकरीता इच्छुक आहेत त्यांनी Declaration व **गोपनीय अहवालांचे इंग्रजी भाषांतर विहित मुदतीत संचालनालयास सादर करणे अत्यावश्यक आहे, अन्यथा शासनाकडे पाठवावयाच्या प्रस्तावात त्यांच्या नावाचा समावेश करणे शक्य होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

सदरची कार्यवाही तातडीने करावी जेणेकरून शासनाकडून आपला प्रस्ताव विहित कालावधीत वित्त विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागास सादर करणे संचालनालयास शक्य होईल.

आपली

रश्मी नांदिवडेकर

**(रश्मी नांदिवडेकर)**
**सहसंचालक (प्रशासन),**
**संचालनालय लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

सोबत : १. Declaration form

## DECLARATION

I hereby declare that I have not more than one wife living.

( )

**Place :**

**Date:**

## DECLARATION

I hereby declare my unconditional willingness for appointment to the INDIAN ADMINISTRATIVE SERVICE in case of selection.

I also further declare that I agree to terminate my lien in the post held by me substantively in the Non-State Civil Service on eventual substantive appointment to the INDIAN ADMINISTRATIVE SERVICE.

( )

**Place :**

**Date:**